Grauer & Weil (India) Limited

CHEMICALS | ENGINEERING | PAINTS | LUBRICANTS | REAL ESTATE

SINCE 1957

Date : 06-08-2026

To,

BSE Limited

Phiroze Jeejeebhoy Towers,

Dalal Street,

Mumbai – 400001

Re : <u>Security Code No. 505710</u>

Subj.: Submission of newspaper publication under Regulation 47 of SEBI (LODR) Regulations, 2015

Dear Sir/Madam,

With reference to the above mentioned subject and Pursuant to Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find attached herewith Copy of the Publication of the unaudited Financial Results of the Company for the Quarter ended 30th June, 2026, as approved by the Board in their Meeting held on 04th August, 2026, in the newspapers viz. Economic Times in English and Maharashtra Times in Marathi language, on 6th August, 2026.

Kindly take the same on the records and acknowledge the receipt.

Thanking you

Yours faithfully,

FOR GRAUER & WEIL (INDIA) LIMITED

GRAUER & WEIL (INDIA) LTD. MUMBAI 400101

CHINTAN K. GANDHI
COMPANY SECRETARY
(MEMBERSHIP NO. – A21369)

Regd. Office: Growel Corporate, Akurli Road, Kandivli (E),
Mumbai (Maharashtra) 400 101, India
T +91 22 66993000 F +91 22 66993010 E hq@growel.com
www.growel.com CIN L74999MH1957PLC010975

NEW PROPOSAL FOR HORMUZ
Vessel Entry at Tehran's Will

WILL US AGREE? Iran, Oman chart out future of oil lifeline; concessions already given: Official

Dubai | Riyadh: A proposed deal between Iran and Oman would give Tehran control over ships entering the Gulf through the Strait of Hormuz, a senior Iranian source and two regional officials said on Wednesday, in one of the biggest concessions yet to Iran.

Despite the apparent step towards yielding to Iranian demands, the sources pushed back against assertions by US President Donald Trump that a deal reopening the strait was imminent, saying important details still had to be agreed.

"The concession has already been made regarding some form of control over Hormuz," one of the regional sources said.

The other regional source said there were still details to be determined about how "control" would be defined, with Gulf negotiators insisting regional countries supervise inspections of ships, and that any payment of fees be voluntary.

The senior Iranian source said that the text of an agreement already on the table envisioned Iran having control of ships heading into the Gulf through the strait, and that one of the main sticking points was what role Iran would also have over ships heading in the opposite direction.

There was no immediate reply from Washington to the disclosures about the proposed agreement. US officials have repeatedly insisted that they would never accept any arrangement that lets Iran control access to the world's most important trade route for energy supplies. But Trump and senior officials in his administration have said in recent days that a deal is imminent to end the war.

AND, THE TRUMP THREAT

"Talks are moving along nicely. If they back out again, they are going to get hit really hard"

OIL UP AFTER RED SEA ATTACK

Oil prices ticked higher on Wednesday after the Iran-aligned Houthi movement in Yemen said it had fired on a Saudi-flagged tanker in the Red Sea, the latest attack on West Asia shipping that has disrupted global energy supplies. But global crude prices remain close to their lowest levels since early July, having plunged sharply over the past two days after Trump called off fresh attacks.

MOVING ALONG NICELY: TRUMP

Trump told Fox News overnight that talks were "moving along nicely" and "an all-day negotiation" had taken place on Tuesday. The Strait of Hormuz "is going to be open very soon," Trump added. **Reuters**

Bibi: Did Not Agree to US-backed Gaza Plan

Prime Minister Benjamin Netanyahu has said Israel did not agree to the US-backed plan for Gaza, even after receiving assurances that an Israeli pullout would only happen after Hamas disarms.

In a video posted to his social media accounts on Tuesday night, Netanyahu said the team of US President Donald Trump "believes that they can bring about the disarmament of Hamas and the demilitarisation of Gaza".

"We are checking this. They sent us a draft – we did not agree to it, it is not our draft. We sent our comments," he said.

Netanyahu met with the US-backed Board of Peace on Monday and received guarantees that the Israeli army would only be required to leave its current positions in Gaza after Hamas disarms.

But pressure has been growing on the premier from the right flank of his ruling coalition to reject the deal. **AFP**

Alarmed by Surge in Executions in Iran: UN

UN rights chief Volker Turk said Wednesday he was "alarmed" by the surge in executions in Iran since March, with the death penalty being used by Tehran to "instil fear".

"Since March 19, 2026, at least 56 people have been executed on national security-related charges, including 27 individuals in cases linked to protests at the start of the year," Turk said in a statement.

"Over 100 others are at risk of execution on similar charges. Executions for drug-related offences are also continuing at an alarming rate."

On March 19, Iran executed three people convicted of killing police officers

INVESTOR, INDUSTRY CONCERNS: CO FALLING BEHIND RIVALS ANTHROPIC & OPENAI

Alphabet Stock Trips as Big Names Depart, Demis Hassabis Moves Up

Nobel winner to be chairman; veteran engineer Dean, Sanjay Ghemawat leave co to launch startup

San Francisco: Google parent company Alphabet on Wednesday announced a leadership overhaul of its AI division, with AI chief Demis Hassabis leaving his main managerial role and several leaders of its Gemini model, including veteran engineer Jeff Dean, departing the company.

The shakeup comes during a pivotal juncture for Google DeepMind: the flagship version of its latest Gemini model remains unreleased despite a planned June launch, sparking investor and industry concerns that Google is falling behind its rivals Anthropic and OpenAI, each of which scooped up a star Google AI staffer this summer.

Shares of Alphabet fell 4% after the news. Hassabis, a Nobel Prize recipient, will take the newly created title of Alphabet's chief scientist and transition from being Google DeepMind CEO to being its chairman, he said in a memo to staff. He cited the closeness of artificial general intelligence (AGI), an advanced state of AI in which computers in essence become as smart as humans, as the impetus for his role change.

The shakeup comes at a pivotal juncture for Google DeepMind model as it remains unreleased despite a planned June launch

"...and I have been long discussing a role that allows him (Hassabis) to put his full attention on actively shaping the future of AGI," Alphabet chief Sundar Pichai said in a separate companywide memo. "It's work that is vitally important to Alphabet and humanity, and I can't imagine a better person than Demis to do it." Koray Kavukcuoglu, the unit's chief technology officer, will assume day-to-day responsibilities.

He will hold the title of senior VP, rather than CEO, of the business unit, in addition to his parallel role as Alphabet's chief AI architect.

Dean, Sanjay Ghemawat, Oriol Vinyals and Quoc Le — some of Google's most famous and lauded AI and engineering leaders — left the company to launch a startup called Discovery Loop, which will focus on researching breakthroughs in machine learning, science and engineering. The startup is structured as a public benefit corporation.

Alphabet did not provide any details on what precipitated the moves or their coincident timing. Hassabis—who has long prioritised research over profits—will explore research and strategy related to societal impacts of AGI and will have few direct reports, a Google spokesperson said. In his company memo, Hassabis touted the "great progress" on Google's AI models including an unreleased upgrade called Gemini 4.

He also said in his memo that he would spend more time with Isomorphic Labs, a drug discovery company that spun out of DeepMind for which he is the founder and CEO.

"I've always believed the No.1 application of AI should be to improve human health," he said.

Reuters

On Xi's Road to Washington, China Adds Drones to US Sanctions List

Beijing is leveraging its dominance over global drone production as it spars again with Washington over widening US curbs on technology and trade, unleashing a barrage of retaliatory actions on Wednesday in what it described as a "restrained" response.

China's Commerce Ministry stiffened controls on the exports of drones as it announced four sets of countermeasures to recent US moves. It cited decisions such as the Federal Communications Commission's ban on some foreign-made robots and power inverters and the blacklisting of more than 40 Chinese companies accused of using forced labor.

The tit-for-tat standoff now pitting Beijing against Washington is reviving tensions between the world's two biggest economies and straining their fragile trade truce. President Xi Jinping is scheduled to meet Donald Trump in the US next month, after agreeing to build a relationship of "constructive strategic stability" during their summit in the Chinese capital in May.

Beijing has been particularly irked by the timing of US sanctions against the 43 Chinese firms, which came just a day after Vice Premier He Lifeng held a video call with US Treasury Secretary Scott Bessent and Trade Representative Jamieson Greer last week. The recent US measures "seriously violated the important common understandings reached by the two heads of state and severely damage China's legitimate rights and interests," a spokesperson for the Commerce Ministry said in a statement. "China has no choice but to take necessary countermeasures in response." But the spokesperson also signaled Beijing's willingness to keep relations on track, calling its retaliation "generally restrained" while urging the US to immediately revoke its measures and return to consultations to resolve differences.

As part of the retaliation package, sales to the US of drones, their key components and related technologies listed on China's dual-use export control list will be subject to "strict case-by-case review," the ministry said. **Bloomberg**

भारतासाठी फिरकीचे जाळे?

दोन्ही कसोटीच्या वेळी फिरकीला साथ देणाऱ्या खेळपट्ट्या अपेक्षित

वृत्तसंस्था, कोलंबो

काही वर्षांपासून भारतीय क्रिकेट संघ मायदेशातील कसोटी मालिकेत फिरकीस अनुकूल खेळपट्ट्यांवर अपयशी ठरला आहे. भारतीय फलंदाजांच्या या कमकुवत बाजूंवर लक्ष्य करण्याचे श्रीलंकेचे आगामी मालिकेत लक्ष्य असण्याची शक्यता आहे. भारताविरुद्धच्या मालिकेतील दोन्ही कसोटीच्या वेळी असलेली खेळपट्टी फिरकी गोलंदाजांसाठी नंदनवन असेल, असा कयास आहे.

भारतीय फलंदाज आता वेगवान गोलंदाजांचा जास्त आत्मविश्वासाने सामना करतात; पण फिरकी माऱ्यासमोर नांगी टाकतात. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या गेल्या मोसमातील मायदेशातील मालिकेत हेच दिसले होते. त्यामुळे श्रीलंकेने मालिकेतील दोन्ही कसोटींसाठी गॉल आणि कोलंबोतील सिंहलीज स्पोर्ट्स क्लबची निवड केली आहे. दोन्ही मैदानांवरील खेळपट्टी प्रत्येक दिवसागणिक फिरकी गोलंदाजांना जास्त साथ देते. त्यामुळे प्रत्येक सत्रात फिरकी गोलंदाज वर्चस्व राखू शकतील. भारतीय फलंदाज फिरकी गोलंदाजांना कसे सामोरे जाणार यावरच या मालिकेचा निर्णय अवलंबून असेल असे मानले जात आहे. काही वर्षांपर्यंत भारतीय फलंदाज फिरकी गोलंदाजांचा सामना करण्यात सर्वांत ताकदवान मानले जात होते. मात्र, काही वर्षांपासून परिस्थिती बदलली आहे. गेल्या काही मोसमात भारतीय संघ न्यूझीलंड, बांगलादेश, वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मायदेशात कसोटी मालिका खेळला. त्यातील नऊपैकी पाच कसोटी गमावल्या आहेत. त्यातही न्यूझीलंडविरुद्धची ०-३ तसेच दक्षिण आफ्रिकेविरुद्धची ०-२ ही हार जास्त सलणारी होती. या दोन्ही मालिकेत प्रतिस्पर्धी संघाचे फिरकी गोलंदाज भारताची डोकेदुखी ठरले होते.

श्रीलंकेत येणाऱ्या प्रत्येक संघास फिरकी गोलंदाजांचा सामना करावा लागतो. त्यांच्या फिरकी गोलंदाजांनी काही वर्षांत प्रतिस्पर्धी फलंदाजांचा कस पाहिला आहे. त्यातही डावखुरा फिरकी गोलंदाज प्रबाथ जयसूर्या जास्त भेदक आहे. त्याने गॉल येथील ११ कसोटीत २६.६२च्या सरासरीने ८१ फलंदाज बाद केले आहेत. या मैदानावर त्याने निम्मा संघ नऊवेळा टिपला आहे. कोलंबोतील सिंहलीज स्पोर्ट्स क्लब मैदानावरील तीन कसोटीत त्याने १५ फलंदाज टिपले आहेत. त्यात दोनदा निम्मा संघ टिपला आहे.

आव्हानाची तयारी सुरू

- श्रीलंका दौऱ्यातील भारतीय संघाचा पहिले सराव सत्र तीन तासांचे
- शुभमन गिल, यशस्वी जयस्वाल, के. एल. राहुल, देवदत्त पडिक्कल, ऋषभ पंत या आघाडीच्या फलंदाजांचा प्रामुख्याने फिरकी गोलंदाजांसमोर सराव
- सरावासाठी तनुष कोटियन, हर्ष दुबे, शिवांग कुमार आणि विप्राज निगम या सरावासाठीच्या गोलंदाजांचा दीर्घ मारा
- स्थानिक डावखुरे फिरकी गोलंदाज तसेच ऑफस्पिनरचा सरावात सहभाग
- तळाच्या फलंदाजांचा सामना प्रामुख्याने वेगवान गोलंदाजांसमोर
- कुलदीप यादवने सरावाच्या पहिल्या दिवशी एकही चेंडू न टाकल्याचे वृत्त
- सारांश जैन आणि रवींद्र जाडेजाकडून गोलंदाजी करताना क्रीजचा मोठ्या प्रमाणावर वापर पडिक्कल तिसऱ्या क्रमांकावर?
- साई सुदर्शन अद्यापही तंदुरुस्त झालेला नाही. त्यामुळे त्याच्या अनुपस्थितीत देवदत्त पडिक्कल तिसऱ्या क्रमांकावर खेळण्याची शक्यता आहे.
- सुदर्शन सराव सामन्यात खेळू शकणार नाही हे निश्चित आहे. त्याचबरोबर तो पहिल्या कसोटीसही मुकण्याची दाट शक्यता आहे.

विंडीज पुन्हा वर्ल्ड कप बाहेर?

वृत्तसंस्था, पोर्ट ऑफ स्पेन

पहिल्या दोन वर्ल्ड कप वनडे क्रिकेट स्पर्धेत वेस्ट इंडिज विजेते होते. मात्र, त्यानंतर त्यांची पीछेहाट सुरू आहे. गेल्या वर्ल्ड कपची त्यांची पात्रता हुकली होती. आता पुढील वर्षी होणाऱ्या वर्ल्ड कप वनडेची थेट पात्रता संकटात आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) वर्ल्ड कप वनडे पात्रतेसाठी ३० सप्टेंबर ही तारीख निश्चित केली आहे. दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबियात ही स्पर्धा आहे; पण त्यातील दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वेला थेट प्रवेश असेल. जागतिक वनडे क्रमवारीतील आठ संघ थेट पात्र ठरतील. अन्य संघांना पात्रतेद्वारे स्पर्धेस पात्र ठरावे लागणार आहे.

जागतिक वनडे क्रमवारीत वेस्ट इंडिज सध्या दहावे आहेत. त्यांच्या दोनच वनडे शिल्लक आहेत. भारतातील हे दोन्ही सामने जिंकले, तरी वेस्ट इंडिज सध्या थेट पात्र न ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांची मदार सध्या अफगाणिस्तान आणि आयर्लंड मालिकेवर आहे. जागतिक वनडे क्रमवारीत अफगाणिस्तान संघ आठव्या, तर आयर्लंड संघ १२व्या क्रमांकावर आहे. आयर्लंडने या मालिकेत ४-१ किंवा ५-० असा विजय मिळवल्यास अफगाणिस्तानची पीछेहाट होईल. या परिस्थितीत भारतातील दोन्ही वनडे जिंकल्यास विंडीजला संधी असेल. अफगाणिस्तानने मालिका जिंकल्यास विंडीजला पात्रता स्पर्धेत खेळावे लागेल.

पात्रता संपण्यापूर्वी दोनच सामने शिल्लक

विंडीज क्रिकेटची पीछेहाट

- २०२३च्या पात्रता स्पर्धेत नेदरलँड्सविरुद्ध सुपर ओव्हरमध्ये हार, पात्रतेच बाद
- या नामुष्कीमुळे प्रथमच विंडीज वर्ल्ड कपला पात्र ठरले नाहीत.
- २०१९च्या स्पर्धेच्या वेळी पात्रता स्पर्धा खेळण्याची वेळ. त्या वेळी झिम्बाब्वेतील पात्रता स्पर्धा जिंकून मुख्य स्पर्धेत स्थान

पात्रता स्पर्धा २२ फेब्रुवारीपासून?

- वनडे वर्ल्ड कप पात्रता स्पर्धा २२ फेब्रुवारी ते २३ मार्च दरम्यान अपेक्षित
- दहा संघांत ही स्पर्धा अपेक्षित.
- ३० सप्टेंबरच्या वनडे क्रमवारीत तळाला असलेल्या दोन संघांना (दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे वगळून) या स्पर्धेत खेळावे लागणार
- वर्ल्ड कप क्रिकेट लीगमधील अव्वल चार संघ; तसेच पात्रता स्पर्धेच्या प्ले-ऑफमधील चार संघांना प्रवेश
- वर्ल्ड कप क्रिकेट लीगमधील तळाचे चार संघ; तसेच चॅलेंज लीगमधील चार संघांत प्ले-ऑफसाठी स्पर्धा
- चॅलेंज लीगमध्ये १२ संघांत चुरस
- पात्रता स्पर्धेतील दुसरा, तिसरा आणि चौथ्या संघात स्पर्धेतील प्राथमिक फेरी

'भारतात आम्हाला सराव सामना नको'

वृत्तसंस्था, मेलबर्न

'भारत दौऱ्याची तयारी म्हणून सराव सामना खेळण्यापेक्षा भारतीय उपखंडात छोटेखानी सरावशिबिर जास्त उपयुक्त ठरेल', अशी टिप्पणी करत मुख्य प्रशिक्षक अँड्रयू मॅक्डोनाल्ड यांनी बुधवारी ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघ भारत दौऱ्यात सराव सामना खेळणार नसल्याचे स्पष्ट केले. पुढील वर्षी ऑस्ट्रेलियाचा कसोटी संघ मानाच्या बॉर्डर-गावसकर करंडकासाठी भारतात येणार आहे. त्या दृष्टिकोनातून मॅक्डोनाल्ड यांनी क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या वेबसाइटला दिलेल्या मुलाखतीत हे भाष्य केले.

ऑस्ट्रेलियाचे प्रशिक्षक मॅक्डोनाल्ड यांचे नियोजन

पाच कसोटींच्या या आव्हानात्मक मालिकेतील सलामीचा सामना २१ जानेवारीपासून नागपूरात रंगणार आहे. 'भारतातील वातावरण, खेळपट्ट्यांशी जुळवून घेण्यासाठी आम्हाला हाती पुरेसा वेळ असेल. त्यामुळे सराव सामना खेळण्यापेक्षा आम्ही सराव शिबिर घेऊ. तसेही सराव सामन्यातून फक्त त्या ठराविक ठिकाणाचा अंदाज येतो', असे मॅक्डोनाल्ड यांनी सांगितले. ऑस्ट्रेलियाने २००४-०५ या मोसमानंतर भारतात कसोटी मालिका जिंकलेली नाही. २०२३च्या भारत दौऱ्यावरील मालिकेला सुरुवात होण्याआधी ऑस्ट्रेलियन्स पूर्वतयारीसाठी बेंगळुरूतील अलूर येथे शिबिर आयोजित केले होते.

दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडविरुद्धच्या मालिकांच्या आधी मात्र 'कांगारूं'नी स्थानिक संघांविरुद्ध सराव सामन्यांत भाग घेतला होता. 'शिबिरासाठी अशा ठिकाणाची निवड होईल जेथील परिस्थिती मालिकेतील कसोटींच्या सगळ्या ठिकाणांशी मिळतीजुळती असेल. सरावात सामन्यातील परिस्थिती तयार करून खेळाडूंना आजमावले जाईल', असे मॅक्डोनाल्ड यांचे म्हणणे आहे. या मालिकेतील कसोटी नागपूर, चेन्नई, गुवाहाटी, रांची आणि अहमदाबाद येथे होतील.

'राष्ट्रकुल'ध्वज गुजरातकडे सुपूर्द

गांधीनगर : राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा ध्वज बुधवारी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. २०३०मध्ये ही स्पर्धा अहमदाबाद शहरात होणार आहे. ग्लासगो येथे नुकताच राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा समारोप झाला.

ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा आणि भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांच्यासह गुजरातचे उपमुख्यमंत्री आणि क्रीडामंत्री हर्ष संघवी उपस्थित होते. तेथे हा ध्वज भारताकडे सोपवण्यात आला होता. यानंतर बुधवारी उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांनी येथे पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा ध्वज मुख्यमंत्री पटेल यांच्याकडे सुपूर्द केला.

सोमय्याच्या 'सूरज दादा'चा धडाका कायम

म. टा. विशेष क्रीडा प्रतिनिधी, मुंबई

जागतिक विद्यापीठ स्क्वॉशच्या अंतिम फेरीत

'आमचा दादा... सूरज दादा'च्या प्रोत्साहनाच्या जोरावर सूरज कुमार चंदने जागतिक विद्यापीठ स्क्वॉश स्पर्धेत पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. विद्याविहारमध्येच वाढलेल्या सूरज कुमार चंदला प्रोत्साहित करण्यासाठी चाहत्यांनी गर्दी केली होती. त्यांच्या प्रोत्साहनापासून प्रेरणा घेत सूरजने सुरुवातीच्या दोन गेमच्या पिछाडीनंतर बाजी मारत अंतिम फेरीत प्रवेश केला.

विद्याविहार येथील सोमय्या विद्यापीठातील टेनिस कोर्टवर खास उभारलेल्या ग्लास कोर्टवर सूरजचा खेळ सुरुवातीच्या पिछाडीनंतर बहरला. त्याने उपांत्य फेरीत फ्रान्सच्या जोशुआ जॅक्स-फिनेरा याचा जवळपास सव्वा तास चाललेल्या लढतीत ९-११, १०-१२, ११-५, ११-२, १२-१० असा पराभव केला. आता त्याच्यासमोर फ्रान्सच्याच बेनेडेक तंकाक्स याचे आव्हान असेल. बेनेडेकने सोमय्याच्याच ओम सेमवाल याचा ११-५, ११-४, १२-१० असा ४३ मिनिटांत पाडाव केला.

सूरजने दक्षिण आफ्रिकेत झालेल्या गतस्पर्धेत ब्राँझ जिंकले होते. यावेळी त्याच्याकडून सरस कामगिरी झाल्याचा आनंद सूरजला होता. 'व्यावसायिक स्पर्धा मालिकेत यापूर्वी जिंकलो आहे. भारताकडून खेळताना प्रथमच विजेता होण्याची संधी आहे. त्यामुळे हे यश नक्कीच जास्त मोलाचे', असे सांगत त्याने आता अंतिम फेरीसाठी कसून तयारी करणार असल्याचे सांगितले.

सूरजच्या या यशात चाहत्यांचा वाटा मोलाचा होता. उपांत्य फेरीतील विजयानंतर तो चाहत्यांचे आभार मानत होता तेव्हा, 'सूरज... सूरज' हा गजर सुरू झाला आणि अखेर मुलाखतकारांना कृपया शांत रहावे, असे आवाहन करावे लागले. 'माझ्या या यशात या प्रोत्साहनाचा मोलाचा वाटा आहे. आगामी सामन्यात मलाच नव्हे तर आमच्या संघालाही सांघिक स्पर्धेत जोरदार लाभ लाभेल असा मला विश्वास आहे,' असे सूरजने विश्वास व्यक्त केला.

पहिल्या दोन गेममध्ये जोशुआने अचानक वाढवलेल्या वेगाशी जुळवून घेणे सूरजला जमले नाही. मात्र त्यानंतरच्या दोन गेममध्ये सतत गुण त्याने गमावले. निर्णायक गेममध्ये तो ८-१० मागे असतानाही त्याला साथ लाभली आणि चित्र बदलले. 'उपांत्यपूर्व फेरीच्या तुलनेत जास्त खडतर लढत होती आणि त्यासाठी तयारीही होती. तिसऱ्या गेमपासून खेळाची योजना बदलली. त्याचा फायदा झाला,' असे सूरजने सांगितले.

स्पर्धेनंतर खेळाडू 'बेपत्ता'

ग्लासगो : ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा संपल्यानंतर अनेक खेळाडू बेपत्ता असल्याचे स्कॉटलंडच्या पोलिसांनी सांगितले.

युगांडाच्या बॉक्सिंग संघातील चार सदस्य स्कॉटलंडमध्ये बेपत्ता झाले असून, मंगळवारी युगांडाच्या परतणाऱ्या संघासोबत ते नव्हते. पाकिस्तान संघातील एक बॉक्सर बेपत्ता झाल्याचे वृत्त आहे. 'परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी तपास सुरू आहे आणि गृह विभागाशी प्राथमिक चर्चा केली जात आहे,' असे स्कॉटलंड पोलिसांच्या प्रवक्त्याने सांगितले.

यापूर्वी गोल्ड कोस्ट (२०१८) तसेच या आधी ग्लासगोतच झालेल्या राष्ट्रकुलमध्ये (२०१४) अशा घटना घडल्या आहेत.

तन्वीने परतवले चिनी आव्हान

कोरिया मास्टर्स बॅडमिंटन

आसान (कोरिया) : गेल्या आठवड्यात तैवान स्पर्धा जिंकणाऱ्या तन्वी शर्मा हिने बुधवारी त्याच जोशात कोरिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत विजयी सलामी दिली. १७ वर्षीय तन्वीने चीनच्या युआन अँन की हिचा २१-१६, २१-१५ असा पराभव करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

तिसरे मानांकन लाभलेल्या या पंजाबच्या कन्येपुढे दुसऱ्या फेरीत आव्हान असेल ते भारताच्याच श्रेयांशी वलिशेट्टी हिचे. श्रेयांशीने पहिल्या फेरीत तैवानच्या पाइ यू पो हिचा २१-१५, २१-१४ असा पराभव केला. मानसी सिंग हिने गेमची पिछाडी भरून काढत दक्षिण कोरियाच्या किम जू इउन हिचे आव्हान १४-२१, २१-१९, २१-९ असे परतवून लावले. अनुभवी किदाम्बी श्रीकांत याचे आव्हान सलामीलाच आटोपले. त्याला इस्त्रायलच्या दानिल दुबोवेंको याच्याकडून २०-२२, २१-१४, १२-२१ असा पराभव पत्करावा लागला.

इतर निकाल : महिला एकेरी- ईशाराणी बरुआ विजयी वि. ली यो युल (कोरिया) २१-१८, १५-२१, २१-७. अस्मिता चालिहा विजयी वि. रिरिना हिरामोतो २२-२०, २१-१८. अनमोल खरब विजयी वि. लो सिन यान हॅपी १६-२१, २१-१७, २१-१२. तान्या हेमंत पराभूत वि. हिना अकेची (जपान) १६-२१, २०-२२. आकर्षी कश्यप पराभूत वि. किम मिन जि २२-२०, २१-२३, ३-२१.

पुरुष एकेरी- सतीश दयानंद दुखापतीमुळे निवृत्त वि. युदाइ ओकिमोतो ११-२१, ४-१३. रोहन चौहान पराभूत वि. जीओन हेओक जिन (कोरिया) २१-२३, १९-२१. तरुण मनेपल्ली पराभूत वि. यो टी. बी. १३-२१, २१-१२, १९-२१. आर. संतोश रामराज विजयी वि. यो पु. वाय. २२-२४, २१-१२, २१-१३. किरण जॉर्ज पराभूत वि. पार्क एस. वाय १५-२१, ९-२१. मिथुन मंजुनाथ पराभूत वि. चेन ११-२१, ९-२१.

कबुतरे, कुत्रे, माकडांचा त्रास आता नाही!

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

कबुतरे, कुत्रे आणि माकडांमुळे येणाऱ्या अडथळ्यांपासून नवी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियम अखेर बुधवारी मुक्त झाले आहे. जागतिक बॅडमिंटन महासंघाने (बीडब्ल्यूएफ) आगामी जागतिक अजिंक्यपद स्पर्धेपूर्वी या स्टेडियममध्ये करण्यात आलेले नूतनीकरण आणि स्वच्छताकामांवर समाधान व्यक्त केले.

जानेवारीत झालेल्या इंडिया ओपन सुपर ७५० स्पर्धेच्यावेळी परदेशी खेळाडूंनी स्टेडियमबाबत तक्रार केली होती. स्टेडियमची अस्वच्छता, शौचालयातील दुर्गंधी तसेच परिसरातील कबुतरे आणि माकडांमुळे होणाऱ्या त्रासाबद्दल खेळाडू आणि अधिकारी नाराज होते. १७ ऑगस्टपासून येथे जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन होईल.

जागतिक स्पर्धेच्या ठिकाणावर बॅडमिंटन महासंघ समाधानी

> गेल्या तीन दिवसांपासून मी इथे एकही कबुतर पाहिले नाही. हा वावर त्या विशिष्ट जेलमुळे थांबला की, काय कोण जाणे? तसेच माकडही माझ्या दृष्टिस पडले नाही...
>
> -सेल्वमरेश सुप्रमणियम, स्पर्धा संचालक

कबुतरे दूर करण्यासाठी जेल!

स्टेडियममध्ये कबुतरांचा वावर रोखण्यासाठी विशिष्ट जेलचा वापर करण्यात आला आहे. या जेलचा वापर विमानतळ परिसरात होत असतो. 'येत्या काही दिवसांपर्यंत स्वच्छता कामाची देखरेख सुरू ठेवावीच लागेल. बरेच कर्मचारी आत-बाहेर येत, जात राहतील. पावसामुळे पुन्हा घाण होऊ शकते. यासाठी सातत्याने स्वच्छता करत राहावी लागेल', अशी सूचनाही सेल्वमरेश यांनी केली.

जानेवारी, फेब्रुवारी, एप्रिल, जून आणि गेल्या काही दिवसांतही स्टेडियमला भेट देत आढावा घेण्यात आला, असे जागतिक महासंघाचे स्पर्धा संचालक सेल्वमरेश सुप्रमणियम यांनी सांगितले. 'स्टेडियममधील शौचालयांचे नूतनीकरण करण्यात आले आहे. नवी आसने बसवण्यात आली असून वायरिंगचे कामही करण्यात आले आहे. छताचा तुटलेला भाग बदलण्यात आला. वॉटरप्रूफिंगही झाले आहे', अशी माहिती सेल्वमरेश यांनी दिली.

भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त

भारतीय क्रीडा प्राधिकरणाने (साई) या परिसरातून भटक्या कुत्र्यांना हटवण्यासाठी पावले उचलली. '६०हून अधिक कुत्र्यांना पकडून तेथून हटवण्यात आले आहे. आताही काही कुत्रे आहेत. त्यांनाही हटवले जाईल', असे सेल्वमरेश यांनी सांगितले.

शब्दखेळ क्र. १८०

रजनीकांत

आडवे शब्द : २. नाराजी ४. मांजर ६. टाळता न येणारे ७. सागराच्या पोटातील अग्नी ९. प्रमाणपत्र १०. केविलवाणा १२. तुच्छ १४. कमळ; मुलींचे एक नाव १६. नम्र १८. अशक्त १९. मेंदूभोवतीची हाडांची रचना २१. मनातील द्वेष २३. मळलेले २४. पुष्कळ

उभे शब्द : १. खोंड, गोऱ्हा; शेतातली झोपडी २. रोख रक्कम ३. पडदा, आवरण ४. गुण, पराक्रम इ. दाखवणाऱ्या चिन्हांची-पदकांची माळ ५. त्वरित ६. आईसक्रीम, सरबत, शिरा वगैरेत वापरले जाणारे आंबटगोड फळ ८. चाबकाची पुढची बाजू ११. शय्या १३. करवंटी; दूध आटलेले जनावर १५. रुचकर १७. बनावट २०. अरण्य २१. पाणी २२. सांप्रत

(उत्तर उद्याच्या अंकात)

शब्दखेळ १७९चे उत्तर

	दो		कौ	प		ध	स
बि	आ	स		रि	क्त		ला
क	ब	र		म		ह	मी
ट		ह	का	ल	प	ट्टी	
	मु	द्द	ल		द		उ
म	ख		वा	स	र		प
	स्तं	भ		म	व	स	र
उ	भ	य	च	र		म	ती